
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
महाराष्ट्र शासन
१६ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिर २०२३-२४
दि. ११ ते १३ ऑक्टोबर २०२३
उद्घाटन समारंभ
समारोप समारंभ

पुण्य नगरी

# राज्य सरकार कामगार, कष्टकऱ्यांच्या पाठीशी उभे : कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे

▮ पिंपरी : प्रतिनिधी

राज्य सरकार कामगार मंडळाच्या, कामगारांच्या तसेच कष्टकऱ्यांच्या मागे ठामपणे उभे आहे. अशा एक ना अनेक योजना, कार्यक्रम व उपक्रमांमधून कामगारांचे प्रबोधन व विकास करण्याचा प्रयत्न, अत्यंत कसोशीने मंडळ करीत आहे. यानंतरही अशा वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करून कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना विविध क्षेत्रांमध्ये विकास करण्याची संधी दिली जाईल असे आश्वासन महाराष्ट्र कामगार मंत्री सुरेश खाडे यांनी देहूत दिले.

देहूगाव येथील गाथा मंदिराच्या प्रांगणात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे १६ वे राज्यस्तरीय भजन प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबीर समारोप कार्यक्रमात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारा




राज्यस्तरी भजन प्रशिक्षण शिबिरात हभप पांडुरंग महाराज घुले यांचा सन्मान करताना कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे.

ते बोलत होते.

यावेळी तीन दिवसीय शिबीर समारोप प्रसंगी हभप गुरूवर्य पांडुरंग महाराज घुले, अध्यक्ष, श्री. संत तुकाराम महाराज वाड्मय संशोधन मंडळ, गाथा मंदिर, हभप रामदास महाराज मोरे, ज्येष्ठ पत्रकार जयंत जाधव, रविराज इळवे, कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार मंडळ हे प्रमुख उपस्थीतीमध्ये होते. सदर शिबिरासाठी गाथा मंदिर व्यवस्थापनेने महत्वपूर्ण योगदान दिले.

हभप रामदास महाराज मोरे म्हणाले, संगीत म्हणजे नामस्मरण. ते कुठेही करता येते. 'कामामध्ये राम. म्हणा रामराम.' ते संगीत इतके क्षमतेचे आहेत की, प्राण्यांनाही ते जवळ करते. प्रमुख पाहुणे हभप पांडुरंग महाराज घुले म्हणाले, वाटचाल ही संतांच्या विचाराने व्हावी. जे करायचे ते नियत पद्धतीने पार पाडलं पाहिजे. असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी तर आभार पुणे विभागाचे सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांनी केले. यावेळी सोलापूरचे कामगार कल्याण अधिकारी समाधान भोसले, कोल्हापूरचे कामगार कल्याण अधिकारी विजय शिंगाडे, सांगलीचे कामगार कल्याण अधिकारी संभाजी पवार हे उपस्थित होते. शिबिराचे संयोजन कल्याण निरीक्षक संजय सुर्वे यांनी केले.

तीन दिवसाच्या या भजन प्रशिक्षणामध्ये संहिता पारायण, वारकरी भजन, महाराष्ट्रातील संत परंपरा, ज्ञानेश्वरी प्रवचन, हरिपाठ, श्रीहरीकिर्तन, व्याख्याने, सगुण निर्गुण भक्ती मार्गदर्शन, काल्याचे हरीकिर्तन, आदी विषयांवर मान्यवरांनी मांडणी केली. भजनातील सुर, ताल, वाद्ये आदिंची तपशिलवार माहिती दिली गेली. या शिबिर कार्यक्रमास महाराष्ट्रातून १२० कामगार शिबीरार्थी उपस्थित राहिले.

दैनिक
चालु वार्ता
Powered by epaper.dainikchaluwartha.com
15 Oct 2023 - Page 2

# संतांची शिकवण ही मानवाचे कल्याण करणारी !

## - कामगार मंत्री डॉ.सुरेश (भाऊ) खाडे

*दै.चालु वार्ता, पिंपरी चिंचवड, प्रतिनिधी,*
◀*बद्रीनारायण घुगे*▶

**देहूगाव :** जगतगुरु, संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा बुडवलेला अभंग गाथा इंद्रायणीच्या ज्या डोहात तरला त्याच ठिकाणी इंद्रायणीच्या तीरावर सुप्रसिद्ध अशा गाथा मंदिराच्या प्रांगणात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे १६ वे राज्यस्तरीय भजन प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले याचा मला आनंद आहे. असे उदगार डॉ.सुरेश खाडे, कामगार मंत्री महाराष्ट्र राज्य यांनी देहूगाव येथे काढले, ते देहु येथे आयोजित शिबीर समारोप कार्यक्रमात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारा बोलत होते. यावेळी तीन दिवसीय शिबीर समारोप प्रसंगी ह.भ.प. गुरूवर्य पांडुरंग महाराज घुले (अध्यक्ष, श्री.संत तुकाराम महाराज वाडमय संशोधन मंडळ, गाथा मंदीर) ह.भ.प. रामदास महाराज मोरे, माजी अध्यक्ष, श्री. संत तुकाराम महाराज संस्थान, देहू., जयंत जाधव, (सह्योगी संपादक). रविराज इळवे, (कल्याण आयुक्त, महाराष्ट्र कामगार मंडळ) आदी मानव्यवर उपस्थिती होते. सदर शिबिरासाठी गाथा मंदिर व्यवस्थापनेने महत्वपूर्ण योगदान दिले.

यावेळी डॉ.सुरेश. खाडे म्हणाले की, संतांची जी शिकवण आहे, ती तुम्ही बरोबर घेऊन जाणार आहात. त्यातून तुमचे कल्याण तर होईलच, पण तुमच्या सहकारी कामगारांना, आणि एकंदरीत समाजाला देखील त्या शिकवणीचा लाभ तुम्ही करून द्याल याची मला खात्री आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून असे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. कामगारांच्या, कष्टकऱ्यांच्या जीवनात, मंडळाच्या अशा विविध उपक्रमांमुळे किती आनंद निर्माण होतो याची अनुभूती मी स्वतः घेतलेली आहे. कारण मी देखील तुमच्या सारखाच या मंडळाच्या उपक्रमांचा एक लाभार्थी कामगार होतो. म्हणूनच कामगार मंत्री झाल्यानंतर या मंडळाकडे विशेष लक्ष दिले आहे, महायुतीचे हे सरकार कामगार मंडळाच्या, कामगारांच्या, कष्टकऱ्यांच्या मागे ठामपणे उभे आहे.

अशा एक ना अनेक योजना, कार्यक्रम व उपक्रमांमधून कामगारांचे प्रबोधन व विकास करण्याचा प्रयत्न, अत्यंत कसोशीने हे मंडळ करीत आहे. यानंतरही अशा वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करून कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना विविध क्षेत्रांमध्ये विकास करण्याची संधी दिली जाईल याची खात्री देतो.




**जीवनाची वाटचाल संतांच्या विचाराने व्हावी**

आपल्या जीवनात आपण आपली वाटचाल अशी चालावी की, ती मुक्कामाला नेऊन सोडावी. वाटचाल ही संतांच्या विचाराने व्हावी. कर्म केल्याविणा आपले शरीर राहू शकत नाही. कर्माचे बनलेले शरीर कर्मचारी करते. कर्मात श्रम असतातच. ते करतांना हलचाल घडत असते. मग प्रश्न असा पडतो की कर्म कोणतं केलं पाहिजे? कोणता रस्ता धरावा? नेमका तिकडे जाणारा रस्ता शोधला पाहिजे. इतरांना वाट विचारली पहिजे. जे करायचे ते नियत पद्धतीने पार पाडलं पाहिजे. सफलता मिळणारे कर्म करावे लागेल. ही संधी आहे. त्या संधीचे सोने केले पाहिजे. पर्यायाने स्वत:ला व समाजाला आणि देशालाही उपयोग होईल.

**ह.भ.प.पांडुरंग महाराज घुले**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी तर आभार प्रदर्शन पुणे विभागाचे सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांनी केले. यावेळी सोलापूरचे कामगार कल्याण अधिकारी समाधान भोसले, कोल्हापूरचे कामगार कल्याण अधिकारी विजय शिंगाडे, सांगलीचे कामगार कल्याण अधिकारी संभाजी पवार हे उपस्थित होते. शिबिराचे संयोजन कल्याण निरीक्षक, संजय सुर्वे यांनी केले. तीन दिवसाच्या या भजन प्रशिक्षणामध्ये संहिता पारायण, वारकरी भजन, महाराष्ट्रातील संत परंपरा, ज्ञानेश्वरी प्रवचन, हरिपाठ, श्रीहरीकिर्तन, व्याख्याने, सगुण निर्गुण भक्ती मार्गदर्शन, काल्याचे हरीकिर्तन, आदी विषयांवर मान्यवरांनी मांडणी केली. भजनातील सुर, ताल, वाद्ये आदिंची तपशिलवार माहिती दिली गेली. या शिबिरात महाराष्ट्रातून १२० कामगार शिबीरार्थी सहभागी झाले होते.

लोकमत दि. 15/10/2023

# आचरण विचारांवर अवलंबून असते

## पांडुरंगमहाराज घुले : राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिर

लोकमत न्यूज नेटवर्क

देहूगाव : कामगार हा समृद्ध झाला पाहिजे, मात्र आयुष्याची शिदोरी घेऊन ऐहिक जीवनाच्या वाटचालीत आपण कसे राहिले पाहिजे, हे संतांनी वेदशास्त्र व पुराण यांचा आधार घेऊन सांगितले. चुकीचे विचार चुकीचा माणूस घडवतात. आचरण हे विचारांवर अवलंबून असते. त्यामुळे आचरण बदलण्यासाठी विचार बदलणे गरजेचे आहे. मनातील विचार कृतीत येतात. मनात व नंतर वाचेत व नंतर कृतीत येते. जात, धर्म, लिंग, वेश यांच्या पलीकडे जाऊन मानवतेचा मंत्र संत तुकाराम महाराजांनी दिला आहे. संतांच्या संगतीत चांगले विचार आपल्या जीवनात घडत जाईल. यासाठी कामगारांनी आपली पावले उचलावीत, असे आवाहन पांडुरंग महाराज घुले यांनी केले.

येथील महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने १६ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन पांडुरंग महाराज घुले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे उपस्थित होते.

### लोकशिक्षणाकडे आपण गांभीर्याने पाहूया

पुरुषोत्तम महाराज मोरे म्हणाले, जिथे संत तुकाराम महाराजांच्या गाथा पुन्हा एकदा समाजासाठी तरल्या, प्रकट झाल्या अशा ठिकाणचे प्रशिक्षण एक नवीन ऊर्जा देऊन जातेय. तुकाराम महाराजांच्या लोकशिक्षणाकडे आपण गांभीर्याने पाहूया, असे आवाहन त्यांनी केले. आभारप्रदर्शन सहायक कल्याण आयुक्त मनोज पाटील यांनी केले. यावेळी कामगार कल्याण अधिकारी विजय शिंगाडे व संभाजी पवार उपस्थित होते.

प्रभात दि. 15/10/2023

# कामगारमंत्र्यांच्या दूरदृश्य प्रणालीद्वारे शुभेच्छा

देहू, दि. १४ (वार्ताहर) - श्री संत तुकाराम महाराज वाङ्मय संशोधन मंडळ, गाथा मंदिर देहू येथे आयोजित १६ व्या राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिराच्या समारोप कार्यक्रमात कामगार मंत्री डॉ. खाडे सांगली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होऊन त्यांनी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. यावेळी कामगार मंत्री डॉ. खाडे यांच्या समवेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे उपस्थित होते.

इंद्रायणीच्या तीरावर गाथा मंदिराच्या प्रांगणात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे १६ वे राज्यस्तरीय भजन प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले याचा मनस्वी आनंद आहे. गाथा मंदिर देवस्थान ट्रस्टने या शिबिरासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देऊन शिबिराच्या सर्व सत्रांसाठी वक्ते आणि मार्गदर्शक उपलब्ध करून दिले. गाथा मंदिराचे संस्थापक हभप पांडुरंग महाराज घुले यांनी राज्यभरातून आलेल्या या कामगारांना मार्गदर्शन केले. याबद्दल कामगार मंत्री डॉ. खाडे यांनी ट्रस्टचे आभार मानले.

# सा.विशाल क्रांती

शनिवार दि.13 आक्टोंबर 2023,संपादक - आप्पासाहेब भोसले. मो.9765150706, email - vishalkranti46@gmail.com

## कामगार कल्याण मंडळाचे १६ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबीर उद्घाटन संपन्न!






देहू - (सुरेश केसरकर) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित १६ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबीर
उद्घाटन आज दिनांक ११ ऑक्टोबर रोजी संपन्न झाले. यावेळी उद्घाटक म्हणून ह.भ.प.गुरुवर्य पांडुरंग महाराज घुले - अध्यक्ष श्री. संत तुकाराम महाराज वाङ्मय संशोधन मंडळ, गाथा मंदीर, क्षेत्र देहू, तसेच ह. भ. प. मा. श्री. पुरुषोत्तम महाराज मोरे - अध्यक्ष श्री. संत तुकाराम महाराज संस्थान, देहू, मा.श्री. किरण जोशी - संपादक, दैनिक पुढारी, मा. श्री.रविराज इळवे - कल्याण आयुक्त म. का. क. मंडळ हे मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रम प्रसंगी उद्घाटक म्हणून ह. भ. प. गुरूवर्य पांडुरंग महाराज घुले आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले की, कामगार हा समृध्द झाला पाहिजे ही मंडळाच्या कल्याण आयुक्तांची मनोमन इच्छा इथे पाहिली. कल्याणाचे दोन भाग पडतात. अभ्युदय आणि निश्रयस.अभ्युद्य म्हणजे लौकिक कल्याण. आपल्या आयुष्याची शिदोरी घेऊन ऐहिक जीवनाच्या वाटचालीत कसे राहिले पाहिजे. यासाठी संतांनी अभ्यासपुर्णतेने आपल्यला सांगितले आहे. वेदशास्त्र पुराणांचे आधार घेऊन कल्याण कसे करता येईल याबाबत मार्गदर्शन केले आहे. मानवाच्या मूलभूत आकांक्षा म्हणजे आनंद व सुख, आपले चांगले व्हावे, अनिष्ट नको. अशा रितीने आपली वाटचाल करायला हवी ज्यामुळे आकांक्षा फलित होईल. ज्याने अनर्थ घडेल असे टाळले पाहिजे. इष्ट ते केले पाहिजे.चुकीचे विचार चुकीचा माणूस घडवतात. आचरण हे विचारांवर अवलंबून असते. त्यामुळे आचरण बदलण्यासाठी विचार बदलने गरजेचे आहे. मनातील विचार कृतीत येतात. मनात व नंतर वाचेत व नंतर कृतीत येते. आपल्या जीवनात वाटचाल कशी करावी हे शिक्षण संतांनी दिले आहे. जनमित्र होई सकळांचा ! असे तुकराम महाराज म्हणतात. कोणाही जीवाचा न घडावा मत्सर! त्याप्रमाणे इतरांचे चांगलेच करण्याचा विचार आपण करावा. जगद्गुरु तुकारामांनी सर्वांना एकत्र आणण्यांचे काम केले. जात धर्म लिंग वेष यांच्या पलिकडे जाऊन मानवतेचा मंत्र संत तुकरामांनी दिला. अस्पृष्यतेचा विचार तुकोबांनी मांडला. जो महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आवडला व त्यांनी त्याचा वृक्ष केला. असे तुकोबांचे विचार आपण अंगिकारुन आपले कल्याण आपण करु शकतो. संतांच्या संगतीत राहून वाईटाकडे पाठ करता येईल. सदविचार आपल्या जीवनात घडत जाईल. यासाठी कामगारांनी आपली पावले उचलावीत. आपले काम हे विनाकुट, लोकनिति धर्मपुर्वक निभावलं पाहिजे. जे आपले राज्य व राष्ट्राला पुढे नेणारे ठरु शकेल. भजन हे समाधान देणारे आहे. पैलतिराला घेऊन जातं. जीवनाची परिपूर्णता हेच भजन करते. या संतांचा विचार घेऊन, आपण पुढे जात आहात हे अभिनंदनीय आहे.

दैनिक पुढारीचे संपादक किरण जोशी म्हणाले की, एकूणच सामाजिक परिस्थीती बिघडत चालली आहे. सोशल मिडियाचा अंधाधुंद वापर असणाऱ्या काळात आपण कामगार भजन शिबीर घेताय, हे कौतुकास्पद आहे. कारण भजनातुन हे जात धर्म पंथाच्या पलिकडे जाऊन सर्व संतांनी समानतेचा संदेश दिला. हा मोलाचा संदेश असाच चालू ठेवुया.ह. भ. प. पुरोषोत्तम महाराज मोरे आपल्या मनोगतात, भजन प्रशिक्षणाचे ठिकाण हे ठिकाण महत्वपूर्ण आहे. जिथे संत तुकाराम महाराजांच्या गाथा पुन्हा एकदा समाजासाठी निर्माण झाल्या, प्रकट झाल्या. अशा ठिकाणचे प्रशिक्षण एक नवीन उर्जा देऊन जातेय. आपल्या ज्ञानाचा व भक्तीचा झरा मोकळा करुन कामगारांनी हे प्रशिक्षण घ्यावे. तुकाराम महाराजांच्या लोक शिक्षणाकडे आपण गांभीर्याने पाहूया. असे आवाहन केले.या तीन दिवसीय भजन प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन दिप्रज्वलन व संत प्रतिमांचे पूजन करुन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी केले व शिबीराचा उद्देश सांगितला. संतांचा सहवासाचा अनुभवच जणु इथे देहुमध्ये घेता येईल ही शाश्वती दिली. उद्घाटन कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मनोज पाटील, प्र. सहाय्यक कल्याण आयुक्त पुणे यांनी केले. यावेळी कामगार कल्याण अधिकारी समाधान भोसले, विजय शिंगाडे व संभाजी पवार उपस्थित होते .

उद्घाटनानंतर प्रशिक्षणातील पहिले सत्रात संहिता व पारायण या विषयावर ह.भ.प. शहाजी मोरे महाराज यांनी कामामध्ये काम ! कांही म्हणा रामराम !! असे सांगत जगतगुरु तुकोबाराय म्हणतात पोटापुरते काम तरी अगत्य तो राम! केवळ लक्ष्मी असुन चालत नाही, विद्या ही अतिशय महत्वाची. आपली दिनचर्या कशी असावी, त्याची शास्त्रानुसार माहिती दिली. संत ज्ञानोबारायांची ज्ञानेश्वरी मधील श्लोकांचे पारायण करण्यात आले.

दुसरे सत्रात - वारकरी भजन प्रशिक्षणात ह. भ. प. केशव महाराज शिवणे यांनी वारक-याचं भजन हेच जीवन आहे. वारक-यांचे भजनात प्रामुख्याने मृदंग, टाळ, विणा, पेटी, चिपळ्या आदी वाद्यांचा वापर केला जातो. या अनुषंगाने सविस्तर मांडणी केली. तिसरे सत्रात महाराष्ट्रातील संत परंपरा व त्यांचे कार्य या विषयावर ह.भ.प. मयूर महाराज बोलके यांनी सदगुरु कडुन मिळणा-या ज्ञानाला परंपरा आहे. संत साहित्य हे गुरु प्रमाणे आहे. अंतकरण शुध्द होते, त्यावेळेस सदगुरु स्वत: आपल्याला भेट घेण्यास येतात. संत परंपरा ही धर्माचे पालन व प्रसार प्रचार करण्याची जबाबदारी घेते. अर्थात संत जन्म घेतात ते कोणत्यातरी कार्यासाठी संत अवतीर्ण होतात. ते मूलभूत गोष्टींचे ज्ञान देतात. महाराष्ट्रातील संत परंपरा ही समृध्द परंपरा आहे. अधिक मांडणी केली. यानंतर हरिपाठ व श्रीकिर्तन सादर झाले.

# दैनिक परतगंगा

गुरुवार दि १३/१०/२०२३ संपादक सखाराम जाधव मो 7887665128

## कामगार कल्याण मंडळाचे १६ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबीर उद्‌घाटन संपन्न!



देहू - (सुरेश केसरकर) महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने आयोजित १६ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबीर उद्घाटन आज दिनांक ११ ऑक्टोबर रोजी संपन्न झाले. यावेळी उद्घाटक म्हणून ह.भ.प.गुरुवर्य पांडुरंग महाराज घुले - अध्यक्ष श्री. संत तुकाराम महाराज वाड्मय संशोधन मंडळ, गाथा मंदीर, क्षेत्र देहू, तसेच ह. भ. प. मा. श्री. पुरुषोत्तम महाराज मोरे - अध्यक्ष श्री. संत तुकाराम महाराज संस्थान, देहू, मा.श्री. किरण जोशी - संपादक, दैनिक पुढारी, मा. श्री.रविराज इळवे - कल्याण आयुक्त म. का. क. मंडळ हे मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रम प्रसंगी उद्घाटक म्हणून ह. भ. प. गुरूवर्य पांडुरंग महाराज घुले आपल्या उद्घाटनपर भाषणात म्हणाले की, कामगार हा समृध्द झाला पाहिजे ही मंडळाच्या कल्याण आयुक्तांची मनोमन इच्छा इथे पाहिली. कल्याणाचे दोन भाग पडतात. अभ्युदय आणि निश्रयस.अभ्युद्य म्हणजे लौकिक कल्याण. आपल्या आयुष्याची शिदोरी घेऊन ऐहिक जीवनाच्या वाटचालीत कसे राहिले पाहिजे. यासाठी संतांनी अभ्यासपुर्णतेने आपल्यला सांगितले आहे. वेदशास्त्र पुरांणांचे आधार घेऊन कल्याण कसे करता येईल याबाबत मार्गदर्शन केले आहे. मानवाच्या मूलभूत आकांक्षा म्हणजे आनंद व सुख, आपले चांगले व्हावे, अनिष्ट नको. अशा रितीने आपली वाटचाल करायला हवी ज्यामुळे आकांक्षा फलित होईल. ज्याने अनर्थ घडेल असे टाळले पाहिजे . इष्ट ते केले पाहिजे.

चुकीचे विचार चुकीचा माणूस घडवतात. आचरण हे विचारांवर अवलंबून असते. त्यामुळे आचरण बदलण्यासाठी विचार बदलने गरजेचे आहे. मनातील विचार कृतीत येतात. मनात व नंतर वाचेत व नंतर कृतीत येते. आपल्या जीवनात वाटचाल कशी करावी हे शिक्षण संतांनी दिले आहे. जनमित्र होई सकळांचा ! असे तुकराम महाराज म्हणतात. कोणाही जीवाचा न घडावा मत्सर! त्याप्रमाणे इतरांचे चांगलेच करण्याचा विचार आपण करावा. जगद्गुरु तुकारामांनी सर्वांना एकत्र आणण्यांचे काम केले. जात धर्म लिंग वेष यांच्या पलिकडे जाऊन मानवतेचा मंत्र संत तुकरामांनी दिला. अस्पृष्यतेचा विचार तुकोबांनी मांडला. जो महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आवडला व त्यांनी त्याचा वृक्ष केला.

असे तुकोबांचे विचार आपण अंगिकारुन आपले कल्याण आपण करु शकतो. संतांच्या संगतीत राहून वाईटाकडे पाठ करता येईल. सदविचार आपल्या जीवनात घडत जाईल. यासाठी कामगारांनी आपली पावले उचलावीत. आपले काम हे विनाकुट, लोकनिती धर्मपुर्वक निभावलं पाहिजे. जे आपले राज्य व राष्ट्राला पुढे नेणारे ठरु शकेल.भजन हे समाधान देणारे आहे. पैलतिराला घेऊन जातं. जीवनाची परिपूर्णता हेच भजन करते. या संतांचा विचार घेऊन, आपण पुढे जात आहात हे अभिनंदनीय आहे. दैनिक पुढारीचे संपादक किरण जोशी म्हणाले की, एकूणच सामाजिक परिस्थीती बिघडत चालली आहे. सोशल मिडियाचा अंधाधुंद वापर असणाऱ्या काळात आपण कामगार भजन शिबीर घेताय, हे कौतुकास्पद आहे. कारण भजनातुन हे जात धर्म पंथाच्या पलिकडे जाऊन सर्व संतांनी समानतेचा संदेश दिला. हा मोलाचा संदेश असाच चालू ठेवुया.ह.भ. प. पुरोषोत्तम महाराज मोरे आपल्या मनोगतात, भजन प्रशिक्षणाचे ठिकाण हे ठिकाण महत्वपूर्ण आहे. जिथे संत तुकाराम महाराजांच्या गाथा पुन्हा एकदा समाजासाठी निर्माण झाल्या, प्रकट झाल्या. अशा ठिकाणचे प्रशिक्षण एक नवीन उर्जा देऊन जातेय. आपल्या ज्ञानाचा व भक्तीचा झरा मोकळा करुन कामगारांनी हे प्रशिक्षण घ्यावे. तुकाराम महारांजांच्या लोक शिक्षणाकडे आपण गांभीर्याने पाहूया. असे आवाहन केले.या तीन दिवसीय भजन प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन दिप्रज्वलन व संत प्रतिमांचे पूजन करुन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंडळाचे कल्याण आयुक्त रविराज इळवे यांनी केले व शिबीराचा उद्देश सांगितला. संतांचा सहवासाचा अनुभवच जणु इथे देहुमध्ये घेता येईल ही शाश्वती दिली. उद्घाटन कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मनोज पाटील, प्र. सहाय्यक कल्याण आयुक्त पुणे यांनी केले. यावेळी कामगार कल्याण अधिकारी समाधान भोसले, विजय शिंगाडे व संभाजी पवार उपस्थित होते .उद्घाटनानंतर प्रशिक्षणातील पहिले सत्रात संहिता व पारायण या विषयावर ह.भ.प. शहाजी मोरे महाराज यांनी कामामध्ये काम ! कांही म्हणा रामराम !! असे सांगत जगतगुरु तुकोबाराय म्हणतात पोटापुरते काम तरी अगत्य तो राम ! केवळ लक्ष्मी असुन चालत नाही, विद्या ही अतिशय महत्वाची. आपली दिनचर्या कशी असावी, त्याची शास्त्रानुसार माहिती दिली. संत ज्ञानोबारायांची ज्ञानेश्वरी मधील श्लोकांचे पारायण करण्यात आले.दुसरे सत्रात - वारकरी भजन प्रशिक्षणात ह. भ. प. केशव महाराज शिवणे यांनी वारक-याचं भजन हेच जीवन आहे. वारक-यांचे भजनात प्रामुख्याने मृदंग, टाळ, विणा, पेटी, चिपळ्या आदी वाद्यांचा वापर केला जातो. या अनुषंगाने सविस्तर मांडणी केली. तिसरे सत्रात महाराष्ट्रातील संत परंपरा व त्यांचे कार्य या विषयावर ह.भ.प. मयूर महाराज बोलके यांनी सदगुरु कडुन मिळणा-या ज्ञानाला परंपरा आहे. संत साहित्य हे गुरु प्रमाणे आहे. अंतकरण शुध्द होते, त्यावेळेस सदगुरु स्वत: आपल्याला भेट घेण्यास येतात. संत परंपरा ही धर्माचे पालन व प्रसार प्रचार करण्याची जबाबदारी घेते. अर्थात संत जन्म घेतात ते कोणत्यातरी कार्यासाठी संत अवतीर्ण होतात. ते मूलभूत गोष्टींचे ज्ञान देतात. महाराष्ट्रातील संत परंपरा ही समृध्द परंपरा आहे. अधिक मांडणी केली. यानंतर हरिपाठ व श्रीकिर्तन सादर झाले.

सकाळ
पिंपरी-चिंचवड
शुक्रवार, १३ ऑक्टोबर २०२३
TODAY

# आचरण बदलण्यासाठी विचार बदला

## पांडुरंग महाराज घुले यांचे मत; कामगार भजन प्रशिक्षण शिबिराचे उद्‌घाटन

देहू, ता. १२ : "भजन हे समाधान देणारे आहे. पैलतिराला ते घेऊन जाते. जीवनाची परिपूर्णता हेच भजन करते. या संतांचा विचार घेऊन. आपण पुढे जात आहात हे अभिनंदनीय आहे. कारण, आचरण बदलण्यासाठी विचार बदलणे गरजेचे आहे," असे मत संत तुकाराम महाराज वाङ्‌मय संशोधन मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग महाराज घुले यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे आयोजित १६ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिर देहूतील गाथा मंदिराच्या आवारात आयोजित केले आहे. त्याच्या उद्‌घाटनप्रसंगी घुले महाराज बोलत होते. संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, कल्याण आयुक्त रविराज इळवे, प्रभारी सहायक कल्याण आयुक्त मनोज पाटील, कामगार कल्याण अधिकारी विजय शिंगाडे, संभाजी पवार, किरण जोशी आदी उपस्थित होते.

प्रशिक्षणात 'संहिता व पारायण' विषयावर शहाजी महाराज मोरे, 'वारकरी भजन' विषयावर केशव महाराज शिवणे, 'महाराष्ट्रातील संत परंपरा व त्यांचे कार्य' या विषयावर मयूर महाराज बोलके यांनी मार्गदर्शन केले. मोरे महाराज म्हणाले, "संत तुकाराम महाराजांच्या गाथा पुन्हा एकदा समाजासाठी निर्माण झाल्या, प्रकट झाल्या. अशा ठिकाणचे प्रशिक्षण एक नवीन ऊर्जा देऊन जाते. आपल्या ज्ञानाचा व भक्तीचा झरा मोकळा करून कामगारांनी हे प्रशिक्षण घ्यावे. तुकाराम महाराज यांच्या लोकशिक्षणाकडे आपण गांभीर्याने पाहूया."

### मानव कल्याणाचा मंत्र तुकोबारांनी दिला

- कल्याणाचे दोन भाग पडतात. अभ्युदय आणि निश्रेयस. अभ्युदय म्हणजे लौकिक कल्याण. आपल्या आयुष्याची शिदोरी घेऊन ऐहिक जीवनाच्या वाटचालीत कसे राहिले पाहिजे. यासाठी संतांनी अभ्यासपूर्णतेने आपल्याला सांगितले आहे. वेदशास्त्र पुराणांचे आधार घेऊन कल्याण कसे करता येईल, याबाबत मार्गदर्शन केले आहे.
- मानवाच्या मूलभूत आकांक्षा म्हणजे आनंद व सुख, आपले चांगले व्हावे, अनिष्ट नको. अशा रीतीने आपली वाटचाल करायला हवी. ज्यामुळे आकांक्षा फलित होईल. ज्याने अनर्थ घडेल असे टाळले पाहिजे. इष्ट ते केले पाहिजे.
- चुकीचे विचार चुकीचा माणूस घडवतात. आचरण हे विचारांवर अवलंबून असते. त्यामुळे आचरण बदलण्यासाठी विचार बदलणे गरजेचे आहे. मनातील विचार कृतीत येतात. मनात व नंतर वाचेत व नंतर कृतीत येते. आपल्या जीवनात वाटचाल कशी करावी हे शिक्षण संतांनी दिले आहे.
- 'जनमित्र होई सकळांचा।' असे तुकराम महाराज म्हणतात. 'कोणाही जिवाचा न घडावा मत्सर।' त्याप्रमाणे इतरांचे चांगलेच करण्याचा विचार आपण करावा. जगद्‌गुरू तुकाराम महाराजांनी सर्वांना एकत्र आणण्याचे काम केले. जात, धर्म, लिंग, वेष यांच्या पलिकडे जाऊन मानवतेचा मंत्र त्यांनी दिला.
- अस्पृष्यतेचा विचार तुकोबारायांनी मांडला आहे. जो महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आवडला व त्यांनी त्याचा वृक्ष केला, असे तुकोबांचे विचार आपण अंगीकारून आपले कल्याण आपण करू शकतो.
- संतांच्या संगतीत राहून वाईटाकडे पाठ करता येईल. सद्‌विचार आपल्या जीवनात घडत जाईल. यासाठी कामगारांनी आपली पावले उचलावीत. आपले काम हे विनातूट, लोकनीती धर्मपूर्वक निभावले पाहिजे. जे आपले राज्य व राष्ट्राला पुढे नेणारे ठरू शकेल.

# आचरण बदलण्यासाठी विचार बदला

## पांडुरंग महाराज घुले यांचे मत; कामगार भजन प्रशिक्षण शिबिराचे उद्‌घाटन

**देहू, ता. १२ :** "भजन हे समाधान देणारे आहे. पैलतिराला ते घेऊन जाते. जीवनाची परिपूर्णता हेच भजन करते. या संतांचा विचार घेऊन. आपण पुढे जात आहात हे अभिनंदनीय आहे. कारण, आचरण बदलण्यासाठी विचार बदलणे गरजेचे आहे," असे मत संत तुकाराम महाराज वाङ्‌मय संशोधन मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग महाराज घुले यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे आयोजित १६ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिर देहूतील गाथा मंदिराच्या आवारात आयोजित केले आहे. त्याच्या उद्‌घाटनप्रसंगी घुले महाराज बोलत होते. संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, कल्याण आयुक्त रविराज इळवे, प्रभारी सहायक कल्याण आयुक्त मनोज पाटील, कामगार कल्याण अधिकारी विजय शिंगाडे, संभाजी पवार, किरण जोशी आदी उपस्थित होते.

प्रशिक्षणात 'संहिता व पारायण' विषयावर शहाजी महाराज मोरे, 'वारकरी भजन' विषयावर केशव महाराज शिवणे, 'महाराष्ट्रातील संत परंपरा व त्यांचे कार्य' या विषयावर मयूर महाराज बोल्के यांनी मार्गदर्शन केले. मोरे महाराज म्हणाले, "संत तुकाराम महाराजांच्या गाथा पुन्हा एकदा समाजासाठी निर्माण झाल्या, प्रकट झाल्या. अशा ठिकाणचे प्रशिक्षण एक नवीन ऊर्जा देऊन जाते. आपल्या ज्ञानाचा व भक्तीचा झरा मोकळा करून कामगारांनी हे प्रशिक्षण घ्यावे. तुकाराम महाराज यांच्या लोकशिक्षणाकडे आपण गांभीर्याने पाहूया."

### मानव कल्याणाचा मंत्र तुकोबारांनी दिला

- कल्याणाचे दोन भाग पडतात. अभ्युदय आणि निश्रयस. अभ्युदय म्हणजे लौकिक कल्याण. आपल्या आयुष्याची शिदोरी घेऊन ऐहिक जीवनाच्या वाटचालीत कसे राहिले पाहिजे. यासाठी संतांनी अभ्यासपूर्णतेने आपल्याला सांगितले आहे. वेदशास्त्र पुराणांचे आधार घेऊन कल्याण कसे करता येईल, याबाबत मार्गदर्शन केले आहे.
- मानवाच्या मूलभूत आकांक्षा म्हणजे आनंद व सुख, आपले चांगले व्हावे, अनिष्ट नको. अशा रीतीने आपली वाटचाल करायला हवी. ज्यामुळे आकांक्षा फलित होईल. ज्याने अनर्थ घडेल असे टाळले पाहिजे. इष्ट ते केले पाहिजे.
- चुकीचे विचार चुकीचा माणूस घडवतात. आचरण हे विचारांवर अवलंबून असते. त्यामुळे आचरण बदलण्यासाठी विचार बदलणे गरजेचे आहे. मनातील विचार कृतीत येतात. मनात व नंतर वाचेत व नंतर कृतीत येते. आपल्या जीवनात वाटचाल कशी करावी हे शिक्षण संतांनी दिले आहे.
- 'जनमित्र होई सकळांचा।' असे तुकराम महाराज म्हणतात. 'कोणाही जिवाचा न घडावा मत्सर।' त्याप्रमाणे इतरांचे चांगलेच करण्याचा विचार आपण करावा. जगद्‌गुरू तुकाराम महाराजांनी सर्वांना एकत्र आणण्याचे काम केले. जात, धर्म, लिंग, वेष यांच्या पलिकडे जाऊन मानवतेचा मंत्र त्यांनी दिला.
- अस्पृष्यतेचा विचार तुकोबारायांनी मांडला आहे. जो महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आवडला व त्यांनी त्याचा वृक्ष केला, असे तुकोबांचे विचार आपण अंगीकारून आपले कल्याण आपण करू शकतो.
- संतांच्या संगतीत राहून वाईटाकडे पाठ करता येईल. सद्‌विचार आपल्या जीवनात घडत जाईल. यासाठी कामगारांनी आपली पावले उचलावीत. आपले काम हे विनातूट, लोकनीती धर्मपूर्वक निभावले पाहिजे. जे आपले राज्य व राष्ट्राला पुढे नेणारे ठरू शकेल.



राम आगरवाल

# भजन केले तर सुखाची प्राप्ती - हभप घुले महाराज

**देहूगाव, दि. ११ (वार्ताहर) -** भजन आणि नामचिंतनात समाधान आहे. कामगारांना काम करता करता नामचिंतन करता येईल. ती भगवान विष्णूची महापूजा होईल, असे तुकोबाराया म्हणतात. म्हणून आपल्या जीवनाची वाटचाल संतांच्या विचाराने करावी असे मत १६ व्या राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिरात श्री संत तुकाराम महाराज वांड्मय संशोधन मंडळाचे अध्यक्ष हभप पांडुरंग महाराज घुले यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने देहूगाव गाथा मंदिर येथे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिर आयोजित

### देहू येथे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिर

केले आहे. या शिबिराचे उद्‌घाटन हभप घुले यांच्या हस्ते करण्यात आले. देहू देवस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे, कल्याण कामगार रविराज इळवे उपस्थित होते.

कामगार मंडळाविषयी बोलताना हभप घुले महाराज पुढे म्हणाले, मंडळाचे नावच कामगार कल्याण मंडळ आहे. त्यातला महत्त्वाचा भाग म्हणजे कामगार घडवायचे, त्यांचे कल्याण झाले पाहिजे, ही प्रमुख भूमिका असून त्यातूनच हे मंडळ निर्माण




झाले आहे. त्यासाठी ज्ञानोबा महाराज म्हणतात, चार वेद, सहा शास्र आणि १८ पुराणे हे काय करतात तर त्या हरीचे भजन करतात. तर तुकोबारायांच्या विचारांप्रमाणे जो चांगले विचार करून चालतो, तो आपल्या जीवनात चांगले आचरण घडवत असतो. आचरण हे विचारावर अवलंबून आहे. कामगारांनी कामगार म्हणून काम करू नये, आपल्या वाट्याला आलेले काम ते काम योग्य काम करावे. म्हणजे जे काम आपल्या उपजीविकेच्या पगारा पुरते नाही.जो पगार मिळणार आहे त्याने आपल्या जीवनाची, कुटुंबाची, संसाराची, वाटचाल घडणार आहे. ग्रामीण भागात एक म्हण आहे अडातच नाही, तर पोहऱ्यात कुठून येणार, म्हणजेच आड आपण अगोदर चांगलाच भरला पाहिजे. आड भरायचे काम हे कामगारांनी केले पाहिजे.



साप्ताहिक

# गजर विठ्ठलाचा

* संपादक - शामराव साळुंखे * कार्यकारी संपादक - स्वप्निल साळुंखे

* RNI-MAHMAR / 2015 / 65533 * Post Reg. No. ABD / 469 / 2022-2024








* वर्ष ८ वे * छत्रपती संभाजीनगर * अंक ३९ वा * गुरुवार दिनांक १२ ते १८ ऑक्टोंबर २०२३ * पाने-४ * किंमत २ रुपये


## सोळाव्या राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षणाचे दिमाखात उद्घाटन'

**देहू : महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ मुंबई आयोजित गट कार्यालय पुणे यांच्यावतीने सोळावे कामगार भजन प्रशिक्षण शिबिराचे मान्यवरांच्या उपस्थितीत बुधवार दिनांक ११ ऑक्टोबर २०२३ रोजी उद्घाटन सोहळा श्री क्षेत्र देहू येथे संपन्न झाला. ह भ प गुरुवर्य पांडुरंग महाराज घुले अध्यक्ष श्री संत तुकाराम महाराज वांग्मय संशोधन मंडळ गाथा मंदिर देहू यांची प्रमुख उपस्थिती या उद्घाटन सोहळ्यासाठी लाभलेली होती. त्याचबरोबर ह भ प पुरुषोत्तम महाराज मोरे अध्यक्ष श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहू, ज्येष्ठ पत्रकार किरण जोशी दैनिक पुढारी, कल्याण आयुक्त रविराज इळवे मुंबई, प्रभारी सहाय्यक कल्याण आयुक्त मनोज पाटील पुणे यांची देखील उपस्थिती होती.**



राज्यस्तरीय भजन स्पर्धेचे उद्घाटन करताना मान्यवर



मनोगत व्यक्त करताना -माननीय कल्याण आयुक्त रविराज इळवे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ मुंबई



कार्यक्रम उद्घाटन प्रसंगी मनोगत व्यक्त करताना ह भ प गुरुवर्य पांडुरंग महाराज घुले अध्यक्ष संत तुकाराम महाराज

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणामध्ये भजन प्रशिक्षणासाठी श्री क्षेत्र देहू हे का निवडले याबद्दल मनोगत व्यक्त करताना सांगितले की या पवित्र क्षेत्राच्या ठिकाणी तुकाराम महाराजांच्या जीवनामध्ये दोन घटना घडल्या, एक म्हणजे संत तुकाराम महाराज यांनी आपल्या वह्या इंद्रायणी मध्ये बुडवल्या त्या वह्या शेतकऱ्यांच्या कर्जाच्या होत्या , त्या वह्या पाण्यात बुडल्याने सावकाराकडे कुठलाही शेतकऱ्याच्या कर्जाचा पुरावा शिल्लक राहिला नाही , व सर्वांची कर्जमाफी झाली, अशाप्रकारे शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे काम संत तुकाराम महाराजांनी केले, आणि दुसरी गोष्ट म्हणजे संत तुकाराम महाराज यांनी आपल्या लेखणीतून लिहिलेल्या संत रचनेच्या वह्या इंद्रायणीमध्ये बुडवण्यात आल्या त्यावेळी महाराजांनी तेरा दिवस इंद्रायणीच्या तीरावर अनुष्ठान केले आणि याचा चमत्कार म्हणून चौदाव्या दिवशी पाण्यातील वह्या भगवंताने वर येऊन ज्या स्थितीत होत्या त्या स्थितीत तुकाराम महाराज यांना परत मिळाल्या. त्याच्यामुळे ही भूमी अतिशय पवित्र व शक्तिशाली आहे व सकारात्मक ऊर्जेचा या ठिकाणी वास आहे. त्यामुळे या ठिकाणी भजन प्रशिक्षण घेण्याचा संकल्प केला व तो पूर्ण झाला सन १९५३ साली या कामगार मंडळाची स्थापना झालेली असून आज पर्यंत कामगारांच्या जीवनात आनंद निर्माण व्हावा म्हणून मंडळांनी नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवून कामगाराच्या जीवनात आनंद प्रफुल्लित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

त्याच्यानंतर किरण जोशी ज्येष्ठ पत्रकार दैनिक पुढारी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की गेल्या पंचवीस वर्षापासून मी पत्रकारिता या व्यवसायात आहे परंतु आज पहिल्यांदाच हा कार्यक्रम अटेंड करण्याचा मला योग आलेला आहे. मी अतिशय समाधानी आहे मंडळाच्या नावातच कल्याण आहे, त्यामुळे वेगवेगळ्या कल्याणकारी योजना राबवून हे मंडळ कामगाराच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे या मंडळाचे धन्यवाद मानावे तेवढे थोडेच आहेत. श्री संत तुकाराम महाराज संस्थान देहू चे अध्यक्ष ह भ प पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी, मनोगत व्यक्त करताना सांगितले की महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे त्या ठिकाणी अनेक थोर थोर संत होऊन गेले .त्यापैकी संत तुकाराम महाराज हे आहेत. संत तुकाराम महाराजांच्या कार्याने पवित्र झालेली ही भूमी म्हणजे सर्वांना अतिशय ऊर्जा स्तोत्र आहे. पाण्यात बुडवलेल्या वह्या तेरा दिवसात जशा आहेत त्या स्थितीमध्ये परत मिळतात. हे ह्या ऊर्जा स्तोत्राचे प्रमुख कारण आहे. अध्यक्षीय भाषणामध्ये ह भ प गुरुवर्य पांडुरंग महाराज घुले संत तुकाराम महाराज वांग्मय संशोधन मंडळ गाथा मंदिर, अध्यक्ष यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की ज्ञानोबा तुकोबारायांचा विचारांचा वारसा घेऊन कामगाराच्या कल्याणासाठी भजन प्रशिक्षण शिबिर शिबिराचे आयोजन महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडून केले गेले .याचे खरे श्रेय महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे कल्याण आयुक्त इळवे यांना दिले तरी ते वावगे ठरणार नाही त्यांनी ह्या या ठिकाणाची भजन प्रशिक्षणासाठी निवड केली ही अतिशय गौरवास्पद बाब आहे कामामध्ये काम काही म्हणा राम राम // या संत रचनेप्रमाणे कामगारांनी काम करत असताना संत नामाचा उच्चार भजनाच्या माध्यमातून करावा संत विचारांच्या वाटेने चालत राहा आपले सर्वस्वी कल्याण झाल्याशिवाय राहणार नाही असाही याप्रसंगी महाराजांनी सल्ला दिला

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माननीय श्री उद्धव काकडे ज्येष्ठ साहित्यिक पुणे यांनी केले

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शनाचे काम प्रभारी सहाय्यक कल्याण मा. श्री. मनोज पाटील पुणे यांनी केले राज्यस्तरीय भजन स्पर्धेसाठी उपस्थित सर्वांचे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने श्री पाटील यांनी आभार व्यक्त केले.



आभार प्रदर्शन व्यक्त करतांना - प्र.सहाय्यक कल्याण आयुक्त श्री. मनोज पाटील पुणे.

# कामगारांनी आपली वाटचाल संतविचाराने करावी

## १६ व्या राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिरात ह.भ.प. पांडुरंग घुले महाराज यांचे प्रतिपादन



### आडातच नाही, तर पोहऱ्यात कुठून येणार?

---

# राज्यस्तरीय कामगार निवासी भजन प्रशिक्षण शिबिर

**पुणे, ता. १०** : पुणे, महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्यावतीने १६वे राज्यस्तरीय कामगार निवासी भजन प्रशिक्षण शिबिर ११ ऑक्टोबर ते १३ ऑक्टोबर या कालावधीमध्ये होणार आहे. हे शिबिर देहू येथील संत तुकाराम महाराज वाङ्मय संशोधन मंडळाच्या गाथा मंदिर येथे सकाळी १० वाजता होणार आहे. कामगारांना वारकरी भजन, अभंग, कीर्तन, प्रवचन, संत साहित्य, महाराष्ट्रातील संत परंपरा, आदींबाबत विविध मान्यवर मार्गदर्शन करणार आहे. शिबिराचे उद्‍घाटन मावळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीरंग बारणे यांचे हस्ते होणार आहे. शिबिरामध्ये महाराष्ट्र राज्यातून विविध जिल्ह्यातील १७३ कामगार सहभागी होणार आहेत.

# कामगारमंत्र्यांच्या दूरदृश्य प्रणालीद्वारे शुभेच्छा

**देहू, दि. १४ (वार्ताहर)** - श्री संत तुकाराम महाराज वाङमय संशोधन मंडळ, गाथा मंदिर देहू येथे आयोजित १६ व्या राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिराच्या समारोप कार्यक्रमात कामगार मंत्री डॉ. खाडे सांगली येथून दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होऊन त्यांनी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. यावेळी कामगार मंत्री डॉ. खाडे यांच्या समवेत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी शशिकांत शिंदे उपस्थित होते.

इंद्रायणीच्या तीरावर गाथा मंदिराच्या प्रांगणात महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे १६ वे राज्यस्तरीय भजन प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले याचा मनस्वी आनंद आहे. गाथा मंदिर देवस्थान ट्रस्टने या शिबिरासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देऊन शिबिराच्या सर्व सत्रांसाठी वक्ते आणि मार्गदर्शक उपलब्ध करून दिले. गाथा मंदिराचे संस्थापक हभप पांडुरंग महाराज घुले यांनी राज्यभरातून आलेल्या या कामगारांना मार्गदर्शन केले. याबद्दल कामगार मंत्री डॉ. खाडे यांनी ट्रस्टचे आभार मानले.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

(महाराष्ट्र शासन)

## १६ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिर २०२३-२४

दि. ११ ते १३ ऑक्टोबर २०२३

## समारोप समारंभ

शुक्रवार, दि. १३ ऑक्टोबर २०२३ रोजी दुपारी ४.३० वाजता

* प्रमुख पाहुणे *

मा. ना. डॉ. सुरेश (भाऊ) खाडे

मंत्री, कामगार, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, सांगली

* विशेष उपस्थिती *

मा. सौ. शितल अनिल हगवणे

उपनगराध्यक्षा, नगर पंचायत, देहू

मा. श्रीमती विनिता वेद-सिंगल, भा.प्र.से.

प्रधान सचिव (कामगार)

ह.भ.प. माणिक महाराज मोरे

विश्वस्त, श्री संत तुकाराम महाराज संस्थान, देहू

मा. श्री. जयंत जाधव

सहयोगी संपादक, सकाळ, पिंपरी-चिंचवड विभाग

कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे

* विनीत *

रविराज इळवे

कल्याण आयुक्त,

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

स्थळ : श्री संत तुकाराम महाराज वाड्मय संशोधन मंडळ, गाथा मंदिर,
श्री क्षेत्र देहू, ता.हवेली,जि.पुणे